# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा पोवाडा

**धन्य बडोदा नगरी अधिपती । न्याय अन निती । वर्णावी किती ।**
**सयाजीराव गायकवाड म्हणती जयांस ।**
**पहिला पहिला हा मुजरा तया चरणांस ।**
**गातो पोवाडा आज दिनांस ॥ जी ॥**

**धन्य धन्य काशीराव पिता । उमाबाई माता । धन्य तो दाता ।**
**महाराणी जमनाबाई माता ।**
**लाभे जयाला राजमाता ।**
**दिन दुबळ्यांचा झाला त्राता ॥ जी ॥**

**सत्तावीस मे अठराशे पंच्याहत्तर । रोजी गुरुवार | बडोदा शहर ।**
**दत्तकनामे झाले राज्यारोहन ।**
**गोपाळाचे सयाजी नामकरण ।**
**बडोदा नगरीचा राजरतन ॥ जी ॥**

**चाल -**
**जगी नवल घडे हे वय बारा उमर ।**
**गोपाळ नामें सयाजी राजगादीवर ।**
**दिवान माधवराव गुरूभाऊ मास्तर ।**
**सर्वांगी ज्ञानाचे केशव पंडित सर ॥**
**तज्ञ आंग्ल शिक्षिका गव्हर्नरास आट ।**
**शिक्षण संचालक आयसिएस (ICS) ईलियट ॥जी॥**

चाल -

आठराशे ऐक्याशी अठ्ठावीस तारीख मार्च महिन्याला ।
"द प्रिन्स" ग्रंथ वाचून चालवी त्यांच्या कार्याला ॥ जी ॥

केली पाहणी राज्याची वेळ दिला दौऱ्याला ।
दिन दुबळ्यांची दशा पाहुन दुःख वाटे राजाला ॥ जी ॥

देऊन आदेश दिली बळकटी विकास कार्याला ।
जना मनाचा लोकराजा शोभे जनतेला ॥ जी ॥

चाल -

सन्मान क्रांती सुर्याचा । थोर महात्म्याचा | फुले ज्योतिबाचा ।
शेतकऱ्याचा असूड स्वयं वदला ।
विचारांचा बांध तेव्हा तुटला ।
ज्योतिबांचा पक्षघात झाला ।
दुःखेवार्ता महाराष्ट्र हळहळला ॥ जी ॥

मदतीचा देऊनी हात ।संकटी मात ।सर्वांगी साथ ।
सावित्रीबाई फुले आईला ।
राजमदतीचा हात दिधला ।
सयाजीराजे धावे संकटाला ॥ जी ॥

चाल -

उच्च शिक्षणा भिमा रामजी आंबेडकर परदेशी धाडीयला ।
शिष्यवृत्ती देऊन भिमावर प्रकाश पाडीयला ॥ जी ॥

दादाभाई नौरोजी, वि.रा. शिंदे, रवि वर्मा चित्रकार ।
न्यायमुर्ती रानडे, बालगंधर्व, गांधी, गोखले नामदार ॥

अरविंद घोष, प्राध्यापक मानिकराव, ज्ञानकोशकार ।
मदन मालविय भाऊराव पाटील, नट कोल्हटकर ॥

अमीन मोतीभाई, उस्ताद फैय्याज खाँ, बडे जहागीरदार ।
अंबुभाई पुराणी, छोटु भाई, जागृतिकार पाळेकर ||

भेद न करता सर्वजणांना केली मदत ।
सढळ हस्ते दिल्या देणग्या नजराणे बहुत ॥ जी ॥

चाल -
मे एकोणीशे सात सनं । सरकारी खर्चान । प्राथमिक शिक्षण ।
मोफत अन् सक्तीचे केले ।
सकल राज्य भर लागू जाहले ।
सयाजीराजे अग्रेसर बनले ॥ जी ॥

त्याकाळी न स्त्री स्वातंत्र्य । असे पारतंत्र । मनुवादी मंत्र ।
म्हणे स्त्री शुद्र गीता वदती ।
जीवित स्त्री मुर्द्या जाळीती ।
गेली सती स्वर्गी जगा सांगती ॥ जी ॥

हिंदू विवाह कायदा मोडीला । जाचक त्या स्त्रीला ।पतीच्या कमाईला ।
नसे हा हक्क तीचा कसला ।
जारी केले विवाह विच्छेदाला ।
लागे लगाम पुरुषी दाश्याला ॥ जी ॥

चाल -
राजे सयाजी वीर योध्यांचे पाठीराखे राहिले ।
राष्ट्रीय काँग्रेस औद्योगिक अधिवेशनात अध्यक्ष जाहले ॥

अस्पृश्यता निवारक परिषद भरली मुंबईला |
सयाजीराजे अध्यक्ष झाले एकोणीशे अठराला ॥

एकोणीशे तेहतीसची धर्म परिषद भरली शिकागोला ।
हर्षट हुअर नेमिती अध्यक्ष सयाजी नरेशाला ॥

तंत्र-विज्ञान घेण्या अनुभव जगी विहार केला ।
नाना संस्कृती, नाना देशी प्रवास तो केला ।।

साहित्य-संस्कृती-विज्ञान, कलेचा असे जानकार ।
बडोदा राज्य कलागुणांचे झाले माहेरघर ॥
चाल -
एकोणीशे एकोणचाळीस । सहा फेब्रुवारीस । आला तो दिस ।
कळीकाळाने डाव साधला ।
वयाच्या शहात्तरी होण्याला ।
संपूर्ण भारत गहिवरला ।
सयाजीराजे महानिर्वाणाला ॥ जी ॥

हि वाहिली शाहिरी कला । महाराष्ट्राला । भारतमातेला ।
सयाजीरावांच गातो गुण ।
धरीतो राष्ट्रीय अभिमानं ।
गाती शाहीर वीरगान ॥ जी ॥

रचनाकार
शाहीर अजिंक्य सुरेश लिंगायत